नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/10/2020 (सोमवार)
(दुपार)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

दिनांक 25/10/2020 रोजी ठाणेदार सपोनि श्री. सुरेश मटटामी, पोलिस स्टेशन केळवद यांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन पांढुर्णा ते नागपूर या महामार्गाने एका 12 चक्का वाहनात काही लोक अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करत आहे. अशा खबरेवरून सपोनि श्री. सुरेश मटटामी हे पो.स्टे केळवद स्टाफसह पांढुर्णा ते नागपुर हायवे क्रमांक 47 वरील खुर्सापार आर टी ओ चेक पोस्ट जवळ नाकाबंदी लावुन वाहन चेकींग करीत असतांना दिनांक 25/10/2020 चे रात्री 20:00 वा. सुमारास एक 12 चक्का ट्रक क्र. आर.जे.– 20/बीजी – 5061 वाहन येतांना दिसला. तेव्हा सदर वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन नागपूरच्या दिशेने बेदरकारपणे पळवु लागला. त्याचा पोलिसांने पाठलाग केला असता सदर ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हायवे क्र. 47 ने सावळी फाटयाच्या दिशेने पळवु लागला. हायवे वरील जाणाऱ्या येणाऱ्या वाहणांना व लोकांना धोका निर्माण होईल इतक्या वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवु लागला. सावळी फाटा येथे समोर वाहने उभे असल्याने सदर वाहन चालकाने त्या ठिकाणी वाहन थांबवून वाहन चालक व त्याच्या सोबत असलेला त्याचा साथीदार बाजेच्या शेतशिवारात पळु लागले. पोलिसांने पाठलाग करून वाहन चालकास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले चालक आरोपी नामे– 1) मुनीम नाजीर खॉ, वय 37 वर्ष, रा. वार्ड क्र. 19, प्रतापपुरा डिंग्गी ता. मालपुरा जि. टोंक राज्य राजस्थान व सोबत पळुन गेलेल्या ईसमाचा आरोपी नामे– 2) नौशाद अमीन खॉ, वय 29 वर्ष, रा. ईस्लामपूरा डिंग्गी जि. जि. टोंक राज्य राजस्थान यांच्या ट्रक क्र. आर.जे.– 20/बीजी – 5061 वाहनाची तपासनी केली असता एकुण 28 गोवंश (गोरे) कि. 2,80,000/–रू. चे जनावर कुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 28 गोवंश जनावरे एकुण किमंती 2,80,000/– रूपयाचे व वाहन 12 चक्का ट्रक किमंत 15,00,000/– रूपये असा एकुण 17,80,000/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पो. स्टे. केळवद येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11(1),(घ)(ड)(च) प्रा.नि.वाग.प्र.अधि.1960 सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 192(अ)/179,184 मोवाका सहकलम 119 महा.पोलीस, सहकलम 279, 34 भादवी कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास पोउपनि श्री. अर्जुन राठोड हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री सुरेश मटटामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, नापोशी राजेन्द्र रेवतकर, रविन्द्र चटप, पोशी सचिन येळकर, मनापोशि अश्विनी निकोसे पोशि धोंडुतात्या देवकते, चालक गुणवंता डाखोळे व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



## कोव्हिड–19 मध्ये दिवंगत झालेले सहा.पो.उपनिरीक्षक सुनिल सेलुकर यांचे कुटूंबास 50 लक्षाचा धनादेश शासना कडून प्रदान करण्यात आला

पोलिस अधिक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर या आस्थापनेवरील दिवंगत सहायक पोलिस उपनिरीक्षक (ब. नं. 684) नेमणुक नियंत्रण कक्ष कार्या. नागपूर ग्रामीण यांना कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये कर्तव्यावर असतांना कोरोना आजाराचा संसर्ग झाल्याने, त्यांचे वैदयकिय उपचारा दरम्यान दिनांक 05/09/2020 रोजी मृत्यु झाला. त्यांची पत्नी श्रीमती सौ. संगीता सुनिल सेलूकर, यांच्या कुटूंबास महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे 50 लक्ष सानुग्रह सहायय अनुदान मंजुर केले असुन, रक्कमेचा धनादेश हा श्री राकेश ओला भा.पो.से. पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर यांचे हस्ते आज दिनांक 26/10/2020 रोजी कार्यालयात प्रदान करण्यात आला आहे.

## निष्काळजीपणे मृत्यु

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील मौजा कट्टा शिवार येथे दिनांक 25/10/2020 चे 01:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रंजीत लखन वरठी, वय 32 वर्ष, रा. कट्टा व त्याचा काका मृतक नामे– महेश मयाराम वरटी, वय 42 वर्ष हे शेतामध्ये धान लावले असल्याने धानाचे राखनी करीता रोज शेत रस्त्याने दिवस–रात्र करीत होते. दि. 25/10/2020 चे रात्री 01.00 वा. दरम्यान फिर्यादींचे काका मृतक हे धानाचे राखनी करुन घराकडे परत येत असता आरोपी नामे– झाडु झीगंजी वरठी, रा. कट्टा याचे शेतात बांध्यामध्ये लावलेले ईलेक्ट्रीक पोल वरुन सेन्ट्रींग ताराचे करंट लावल्याने यातील मृतक हा पायदळ येत असता त्याचे उजव्यापायाला सेन्ट्रींग ताराचे स्पर्श झाल्याने त्याला करंट लागुन ते जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास परि पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मी घोडके 8830614950 या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर चौधरी हॉस्पीटल कामठी येथे दिनांक 24/10/2020 चे 21.00 वा. दरम्यान रविंद्र भाऊराव आगासे(मृतक), वय 32 वर्ष, रा. धरमनगर यांनी अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. दरम्यान त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता त्यांना चौधरी हॉस्पीटल कामठी येथे नेले असता दि. 25/10/2020 चे 10:05 वा. सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जितेन्द्र भाऊराव आगासे, वय 35 वर्ष, रा. धरमनगर कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवा वरखडे 9637005303 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर